**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 09 वाजून 20 मिनिटं**

**दिनांकः01.07.2024** **वारःसोमवार**

---

**ठळक बातम्या,**

- निवडणुकीतून राज्यघटना आणि लोकशाहीवर मतदारांनी आपला अढळ विश्वास दर्शवल्याचं पंतप्रधानांचं मन की बातमध्ये प्रतिपादन,
- देशात आजपासून तीन नवे फौजदारी कायदे लागू होणार,
- जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी नवे लष्करप्रमुख म्हणून पदभार स्वीकारला,
- T-20 विश्वचषक विजेत्या पुरुष क्रिकेट संघासाठी बी सी सी आय कडून, 125 कोटी रुपयांची बक्षीसं जाहीर

  **आणि**
- महाराष्ट्रात वर्षा सहलीदरम्यान दुर्घटना, एकाच कुटुंबातील पाच जण वाहून गेले

**<u>मन की बात</u>**

65 कोटी नागरिक सहभागी झालेल्या, जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीतील नुकतीच झालेली सार्वत्रिक निवडणूक यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांचे आभार मानले आहेत. तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर, आकाशवाणीवरील पहिल्याच ‘मन की बात’ या कार्यक्रमातून त्यांनी काल देशवासीयांशी संवाद साधताना मोदी यांनी आपल्या

भावना व्यक्त केल्या. जगातल्या अन्य कुठल्याही देशात हे घडलेलं नाही, असं सांगत, त्यांनी निवडणूक यंत्रणेचं आणि मतदारांचं अभिनंदन केलं.

जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी नियमितपणे योगाभ्यास करण्याचं आवाहन त्यांनी नागरिकांना केलं. आजपासून देशांत तीन नवीन फौजदारी कायदे लागू होत आहेत, त्यावरही त्यांनी भाष्य केलं.

या वर्षीच्या जागतिक पर्यावरण दिनाच्या औचित्याने सुरू करण्यात आलेल्या 'एक पेड माँ के नाम' या विशेष मोहिमेबद्दल पंतप्रधानांनी माहिती दिली.

दहावा आंतरराष्ट्रीय योग दिवस संपूर्ण जगभरात उत्साहाने साजरा करण्यात आल्याचं सांगत, दरवर्षी योगदिनाचे नवनवीन विक्रम प्रस्थापित होत असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. अमेरिका, ईजिप्त, म्यानमा, बहारीन, श्रीलंका, मार्शल बेटं, भुतान यांसह, अनेक देशांमध्ये योग दिनानिमित्त राबवण्यात आलेल्या अभिनव उपक्रमांची पंतप्रधानांनी माहिती दिली.

पुढील महिन्यापासून पॅरिसमध्ये ऑलिम्पिक स्पर्धा सुरू होत आहेत. या स्पर्धेत सहभागी होत असलेल्या सर्व खेळाडूंना मोदी यांनी शुभेच्छा दिल्या आणि हे खेळाडू देशाला अधिकाधिक पदकं मिळवून देतील असा विश्वासही व्यक्त केला.

आकाशवाणीवरून प्रसारित होत असलेल्या संस्कृत बातमीपत्राला काल 50 वर्षं पूर्ण झाली. यानिमित्तानं, पंतप्रधानांनी आकाशवाणीचं अभिनंदन केलं.

कुवेत सरकारने, त्यांच्या आकाशवाणीच्या राष्ट्रीय वाहिनीवरून हिन्दी मध्ये एक विशेष कार्यक्रम सुरू केला असल्याची माहिती पंतप्रधानांनी यावेळी दिली.

## <u>नवीन कायदे</u>

जुन्या ब्रिटिशकालीन कायद्यांच्या जागी तयार करण्यात आलेले तीन नवीन फौजदारी कायदे देशभरात आजपासून लागू होत आहेत. भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष अधिनियम असे हे तीन नवे कायदे आहेत. हे तीन नवे फौजदारी कायदे अंमलात आणण्यापूर्वी केंद्र सरकारनं

राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांबरोबर वरचेवर बैठका घेतल्या. त्यामुळे सर्व राज्यं तंत्रज्ञान, क्षमता उभारणी आणि जागृती निर्माण करणं या सर्व पातळ्यांवर नवीन कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी पूर्ण तयारीनिशी सज्ज आहेत. सर्व नागरिकांसाठी अधिक सुलभ, आश्वासक आणि कार्यक्षम न्याय व्यवस्था निर्माण करणं हा या कायद्यांचा उद्देश आहे.

**नवीन लष्करप्रमुख**

जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी काल नवी दिल्लीत नवे लष्करप्रमुख म्हणून पदभार स्वीकारला. भारतीय लष्कराचे ते तिसावे  लष्करप्रमुख आहेत. लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे चार दशकांच्या लष्करी सेवेतून काल निवृत्त झाल्यानं त्यांच्या जागी जनरल द्विवेदी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. लष्कराच्या उत्तर कमांडमध्ये तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. नवे लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी १९८४मध्ये लष्कराच्या सेवेत दाखल झाल्यापासून आपल्या ४० वर्षांच्या कारकिर्दीत उत्तर विभागाच्या प्रमुख पदासह इतर अनेक वरिष्ठ पदांवर काम केलं आहे. त्यांना परम विशिष्ट सेवा पदक तसंच अति विशिष्ट सेवा पदकांनी गौरवण्यात आलं आहे.

**नौदल प्रमुख- ढाका**

नौदलप्रमुख ॲडमिरल दिनेश कुमार त्रिपाठी यांचं, चार दिवसांच्या अधिकृत बांग्लादेश दौऱ्यासाठी काल ढाका इथे आगमन झालं. उभय  देशांमधील नौदल सहकार्य वाढवण्याचे नवीन मार्ग शोधणं तसंच द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करणं हा या दौऱ्याचा उद्देश असल्याचं, संरक्षण मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकांत म्हंटलं आहे. ॲडमिरल त्रिपाठी, त्यांचे समकक्ष ॲडमिरल एम. नजमूल हसन यांची भेट घेणार असून,  बांग्लादेशचे  लष्करप्रमुख आणि वायु दल प्रमुखांचीही ते भेट घेणार आहेत. गुरुवारी चितगोंग इथं होणाऱ्या, बांग्लादेश नौदल अकादमीच्या दीक्षांत संचलनाची ते पाहणी करणार आहेत.

**संयुक्त राष्ट्र बैठक**

अफगाणिस्तानमध्ये संयुक्त राष्ट्रांच्या नेतृत्त्वाखाली होत असलेल्या सम्मेलनामध्ये भारत सहभागी होत आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे संयुक्त सचिव जे.पी.सिंह या संमेलनात भारताचं प्रतिनिधित्व करणार आहेत. तालिबानशासित अफगाणिस्तानमधील लोकांच्या जीवनात सुधारणा आणि सुलभता आणण्यासंदर्भात उपाययोजना करण्यासाठी होत असलेल्या या तिसऱ्या संमेलनात भारतासह अन्य 25 देश सहभागी झाले आहेत. या चर्चेमध्ये तालिबान पहिल्यांदाच सहभागी होत असल्यानं हे संमेलन खूप महत्वपूर्ण होणार आहे.

असं असलं तरी दोहा मध्ये होत असलेली ही बैठक तालिबानला अंतरराष्ट्रीय मान्यता देणारा मार्ग ठरेल, या वक्तव्याला संयुक्त राष्ट्रांनी मात्र नकार दिला आहे. अफगाणिस्तानच्या भूमीचा उपयोग दहशतवादी कारवायांसाठी न होऊ देणं, ही भारताची प्राथमिकता असेल. तसच आंतरराष्ट्रीय गटांनी अफगाणिस्तानमाधील दहशतवाद कमी करणं, महिला आणि अल्पसंख्यांकांना त्यांचे अधिकार मिळवून देणं, मानवी सहाय्यता करणारं सरकार तयार करण्यावर भर देणं यावर विचार करावा, असही भारतानं म्हटलं आहे.

**<u>जयशंकर-कतार</u>**

केंद्रीय परराष्ट्र व्यवहारमंत्री एस. जयशंकर यांनी कतारचे पंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री मोहम्मद-बीन अब्दुल रहमान बीन जस्सीम अल् थांनी यांची काल दोहा इथे भेट घेतली. उभय नेत्यांनी राजकीय, व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा, तंत्रज्ञान, संस्कृती या मुद्यांवर चर्चा केली तसंच द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेतला. गाझा मधील परिस्थितीबाबत कतारने स्वीकारलेल्या भूमिकेची जयशंकर यांनी प्रशंसा केली. भारत-कतार संबंध आणखी वृद्धिंगत करण्यास तसंच परस्पर हितांच्या मुद्यांवर संवाद सुरू ठेवण्यास आपण उत्सुक असल्याचं जयशंकर यांनी यावेळी सांगितलं.

**ॲंटीडंपिंग**

एका देशांतर्गत कंपनीच्या तक्रारीनंतर भारताने चीन, थायलंड आणि बहरीनमधून आयात केलेल्या ग्लास फायबरची मूल्यापवात प्रतिरोध अर्थात अँटी डंपिंग तपासणी सुरू केली आहे. या प्रकरणाची पुष्टी झाल्यास, अँटी डंपिंग शुल्क लागू केले जाऊ शकते. व्यापार उपाय महासंचालनालय अर्थात DGTR ने,  तक्रारदार कंपनीने, उत्पादनाच्या डंपिंगबाबत तयार केलेल्या पुराव्यांच्या आधारे डंपिंगविरोधी तपास सुरू केला. स्वस्त उत्पादनांच्या आयातीमुळे देशांतर्गत उद्योगांना होणारी इजा तपासण्यासाठी ही तपासणी केली जाते.

**नीट बिहार**

केंद्रीय अन्वेषण विभागाकडून काल पाटण्यातील बेउर इथल्या मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आलेल्या नीट प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणातील आरोपींची चौकशी करण्यात आली. सीबीआय नं या प्रकरणी पाटणा कारागृहात सलग दुसऱ्यांदा चौकशी केली आहे. आत्तापर्यंत सीबीआय नं बिहार आणि झारखंड मधून 5 संशयित आरोपींना अटक केली आहे. बेउर कारागृहातील अन्य 13 आरोपींचीही या संदर्भात चौकशी सुरू असून, बिहार पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेनं याधीच अटक केलं आहे. 24 जून ला सीबीआय नं हे प्रकरण आपल्या हातात घेतलं आहे.

**जडेजा निवृत्ती**

भारताचा अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजाने काल वीस षटकांच्या  आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. भारतीय संघातील बिनीचे फलंदाज विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनी बार्बाडोसमध्ये निवृत्तीची घोषणा केल्यानंतर लगेचच जडेजाने देखील निवृत्तीची घोषणा केली. जडेजाने  फेब्रुवारी 2009 मध्ये श्रीलंकेविरुद्ध आपल्या क्रिकेट कारकिर्दीला सुरुवात केली.

**क्रिकेट-बक्षीस**

टी 20 विश्वचषक चषकाला गवसणी घातलेल्या भारतीय पुरुष क्रिकेट संघासाठी भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं 125 कोटी रुपयांच्या पुरस्कारांची घोषणा केली आहे. शनिवारी रात्री बार्बाडोस मधील भारताच्या विजयानंतर नियामक मंडळाचे सचिव जय शहा यांनी भारतीय खेळाडूंचं अभिनंदन केलं आणि  ही घोषणा केली.

**महिला क्रिकेट**

भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका महिला क्रिकेट कसोटी सामन्यात कालभारताची स्नेहा राणा हिनं 8 गडी बाद करून इतिहास घडवला. चेन्नईच्या एम. ए. चिदंबरम मैदानावर हा सामना सुरू आहे. स्नेहानं आठ तर दीप्ती शर्मानं दोन गडी बाद केले. तत्पूर्वीभारतानं 6 बाद 603 धावांवर डाव घोषित केला होता. त्यानंतर भारताने दक्षिण आफ्रिकेचा डाव 266 धावांत गुंडाळत त्यांना पुढे चाल दिली. दुसऱ्या डावात दक्षिण आफ्रिकेच्या संघाच्या दिवसअखेर 2 बाद 232 धावा झाल्या होत्या.

**लोणावळा-दुर्घटना**

महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील लोणावळ्या इथे  वर्षा सहलीसाठी गेलेल्या एकाच कुटुंबातील पाच जण काल भुशी धरणात वाहून गेले. हे सर्वजण पुण्यातील रहिवासी होते. यात एक महिला आणि चार लहान मुलांचा समावेश आहे. यापैकी तिघांचे मृतदेह सापडले असून इतरांचा शोध सुरू असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**